महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७९७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-३/२०२१/ 5147
दिनांक : १७/११/२०२१
17 NOV 2021

प्रति,

प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनरत सर्व पदविका व पदवी,
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग पुणे)

**विषय : दि.१९ नोव्हेंबर २०२१ ते दि.२५ नोव्हेंबर २०२१ हा सप्ताह "कौमी एकता सप्ताह" म्हणून साजरा करण्याबाबत**

सदर्भ :१. शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग यांचे शासन परिपत्रक पत्र क्र.कौएदि-२०२१/प्र.क्र.६८/का ८ दि.१० नोंव्हेबर २०२१

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भांकित शासनपत्राच्या अनुषगाने आपणांस कळविण्यात येते की, केंद्र शासनाने सन १९८६ मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार **दि.१९ नोव्हेंबर २०२१ ते दि.२५ नोव्हेंबर २०२१ हा सप्ताह "कौमी एकता सप्ताह"** म्हणून राज्यात साजरा करावयाचा असून त्यामध्ये आयोजित करावयाच्या संदर्भीय शासन निर्णयात दिलेल्या कार्यक्रमात जास्तीत जास्त लोकांचा सहभागी करुन घ्यावयाचे आहे. त्यानुसार यावर्षी **शुक्रवार** दि. **दि.१९ नोव्हेंबर २०२१ ते गुरुवार दि.२५ नोव्हेंबर २०२१ हा सप्ताह "कौमी एकता सप्ताह" म्हणून पाळण्यात यावा व कोव्हीड-१९ विषाणूच्या संसर्गाची पार्श्वभूमी विचारात घेता, लोक सहभागाबाबत योग्य खबरदारी घेऊन** संदर्भीय शासन निर्णयात दिलेल्या कार्यक्रमाचे आयोजिन करण्यात यावे.

संदर्भीय शासन परिपत्रक सोबत जोडण्यात येत आहे पुढील योग्यत्या कार्यवाहीस्तव अग्रेषित करणेत येत आहे.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- १. प्रोग्रमर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावरती प्रदर्शित करण्याकरीता

दि.१९ नोव्हेंबर, २०२१ ते दि.२५ नोव्हेंबर, २०२१ हा सप्ताह "कौमी एकता सप्ताह" म्हणून साजरा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः कौएदि - २०२१/प्र.क्र. ६८/का.८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १० नोव्हेंबर, २०२१.

## शासन परिपत्रक

केंद्र शासनाने सन १९८६ मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार **दि.१९ नोव्हेंबर, २०२१ ते दि.२५ नोव्हेंबर, २०२१** हा सप्ताह **"कौमी एकता सप्ताह"** म्हणून राज्यात साजरा करावयाचा असून त्यामध्ये आयोजित करावयाच्या पुढील कार्यक्रमात जास्तीत जास्त लोकांना सहभागी करुन घ्यावयाचे आहे. त्यानुसार यावर्षी **शुक्रवार दि.१९ नोव्हेंबर, २०२१ ते गुरुवार दि.२५ नोव्हेंबर, २०२१** हा कालावधी **"कौमी एकता सप्ताह"** म्हणून पाळण्यात यावा व कोव्हीड १९ विषाणूच्या संसर्गाची पार्श्वभूमी विचारात घेता, लोक सहभागाबाबत योग्य खबरदारी घेऊन खालीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत:-

१) **शुक्रवार दिनांक १९ नोव्हेंबर, २०२१- राष्ट्रीय एकात्मता दिवस** : धर्मनिरपेक्षता जातीयवादी विरोध व अहिंसा यांच्यावर भर देणारे सभा, चर्चासत्रे व परिसंवाद Online/वेबिनार (Webinar) इत्यादी पध्दतीने आयोजित करावेत.

२) **शनिवार दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ - अल्पसंख्याक कल्याण दिवस** : अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी १५ कलमी कार्यक्रमांवर भर देण्यात यावा. कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार यावर्षी मिरवणूका काढण्यात येवू नयेत.

३) **रविवार दिनांक २१ नोव्हेंबर, २०२१ - भाषिक सुसंवाद दिवस** : भारताच्या अन्य भागातील लोकांच्या भाषेचा वारसाचा परिचय करुन देण्याच्या दृष्टीने Online/ वेबिनार इ. पध्दतीने विशेष वाङमयीन कार्यक्रम व कवी संमेलने आयोजित करण्यात यावीत.

४) **सोमवार दिनांक २२ नोव्हेंबर, २०२१ - दुर्बल घटक दिवस** : २० कलमी कार्यक्रमाअंतर्गत अनुसूचित जाती व जमाती मधील व्यक्ती व कमकुवत घटकातील व्यक्ती यांना मदत करण्यासाठी ठरवून

दिलेले कार्यक्रम ठळकपणे निदर्शनास आणण्याच्या दृष्टीने कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार यावर्षी अशा प्रकारचे कार्यक्रम Online/वेबिनार (Webinar) इत्यादी पध्दतीने आयोजित करावेत.

५) **मंगळवार दिनांक २३ नोव्हेंबर,२०२१ - सांस्कृतिक एकता दिवस :** भारतीयांच्या विविधतेतील एकतेवर भर देणारे आणि सांस्कृतिक संरक्षण व एकात्मता संबंधाची भारतीय परंपरा सादर करणारे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत. कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार यावर्षी अशा प्रकारचे कार्यक्रम Online/वेबिनार (Webinar) इत्यादी पध्दतीने आयोजित करावेत.

६) **बुधवार दिनांक २४ नोव्हेंबर, २०२१- महिला दिन :** भारतीय समाजातील महिलांचे महत्व व राष्ट्र उभारणीच्या विकासामधील त्यांची भूमिका यावर भर देणारे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत उपरोक्त सर्व कार्यक्रम आयोजित करताना केंद्र व राज्य शासनाच्या कोव्हीड-१९ च्या संदर्भातील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.

७) **गुरुवार दिनांक २५ नोव्हेंबर, २०२१ - जोपासना दिवस :** पर्यावरणाची जोपासना व त्याची जाणीव यासाठीच्या वाढत्या गरजेवर भर देणारे मेळावे व कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत. कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार यावर्षी अशा प्रकारचे कार्यक्रम Online/वेबिनार (Webinar) इत्यादी पध्दतीने आयोजित करावेत.

२. **यावर्षी दिनांक २५ नोव्हेंबर, २०२१ रोजी राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घ्यावयाची आहे**. या शपथेचा नमुना सोबत जोडला आहे. राज्यातील सर्व केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या कार्यालयातून ही शपथ घेण्याचा कार्यक्रम राबविण्यात यावा. अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी जागेवर उभे राहून/ प्रांगणात सामाजिक अंतर ठेऊन (Social distance चे पालन करून) राष्ट्रीय एकात्मकतेची शपथ घ्यावी. तसेच भित्तीपत्रके, फलक यांच्यावर ठसठशीत असे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिकचिन्ह प्रदर्शित करावे.

३. कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर विद्यापीठे, महाविद्यालये आणि शाळा बंद असल्याने तेथे यावर्षी कोणतेही कार्यक्रम आयोजित करता येणार नाहीत.

४. स्वयंसेवी संस्थांनी करावयाचे कार्यक्रम त्यांच्या सोयीने करण्याची त्यांना मोकळीक आहे. कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार यावर्षी अशा प्रकारचे कार्यक्रम Online/वेबिनार (Webinar) इत्यादी पध्दतीने आयोजित करावेत. खालीलपैकी एक तरी कार्यक्रम त्यांनी राष्ट्रीय एकात्मता सप्ताहात ठेवावा -

१) राष्ट्रीय एकात्मतेवर प्रख्यात पुढाऱ्यांची भाषणे
२) राष्ट्रीय एकात्मतेची शपथ सामूहिकरित्या घेणे.
३) सांस्कृतिक कार्यक्रम करणे
४) राष्ट्रगीताचे सामूहिक गायन

५. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने निरनिराळ्या माध्यमाव्दारे या कार्यक्रमांस प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच राष्ट्रीय एकात्मतेचे संदेश देणारे चित्रपट दाखविले जातील असे पहावे.

६. महिला व बालविकास विभाग तसेच पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांनी विविध ठिकाणी उचित कार्यक्रम आयोजित करुन पार पाडावेत.

७. कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनांच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करून Online/ वेबिनार (Webinar) इत्यादी व्दारा जास्तीत जास्त संवाद/ मार्गदर्शक कार्यक्रम आयोजित करावे.

८. सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपआपल्या कार्यक्षेत्रात सर्व संबंधितांची मदत घेऊन हा कार्यक्रम वरीलप्रमाणे त्यांच्या विविध माध्यमातून आखला जाईल व यशस्वी केला जाईल असे पहावे. तसेच केलेल्या कार्यक्रमाचा अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेताक २०२१११११०१५४०११०७१४ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DINESH MADHAVRAO SONAVANE

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. सर्व विभागीय आयुक्त,
७. सर्व जिल्हाधिकारी,
८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
९. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,
१०.पोलिस महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य,
११.सर्व पोलिस आयुक्त,
१२.सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक,
१३.अध्यक्ष/ सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई,
१४.अध्यक्ष/ कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई,
१५. मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व महामंडळे, मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापकीय संचालक/प्रशासकीय अधिकारी,
१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
१७.कक्ष अधिकारी, सा.प्र.वि./२८ व २९, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई (मंत्रालयात राष्ट्रीय एकात्मकतेची शपथ घेण्याचा कार्यक्रम आयोजित करण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या कार्यवाहीसाठी)
१८. कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान कक्ष, मंत्रालय, मुंबई (२ प्रती संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)
१९. निवड नस्ती (का-८).

## राष्ट्रीय एकात्मता शपथ

" मी गांभीर्यपूर्वक शपथ घेतो/ घेते की, देशाचे स्वातंत्र्य आणि राष्ट्रीय एकात्मा अबाधित राखण्यासाठी व दृढ करण्यासाठी मी निष्ठापूर्वक काम करीन"

मी अशीही प्रतिज्ञा करतो/करते की, मी कधीही हिंसाचाराचा अवलंब करणार नाही. तसेच मी सर्व धार्मिक, भाषिक किंवा प्रादेशिक मतभेद व तंटे किंवा इतर राजकीय वा आर्थिक गाऱ्हाणी शांततामय आणि सांविधानिक मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न चालू ठेवीन.

## राष्ट्रीय एकात्मता प्रतिज्ञा

"मै सत्यनिष्ठा से प्रतिज्ञा करता हुं की देश आझादी तथा एकता बनाये रखने और उसे मजबूत रखने के लिए समर्पित होकर कार्य करुंगा"

"मै यह भी प्रतिज्ञा करता हूँ की कभी हिंसा का सहारा नही लूंगा तथा धर्म, भाषा, क्षेत्र से संबंधित भेदभाव और झगडो और अन्य राजनैतिक या आर्थिक शिकायतो का निपटारा शांतीपूर्ण तथा संवैधानिक तरीको से करने के लिए प्रयास करता रहूंगा"

## National Integration Pledge

"I solemnly pledge to work with dedication to preserve and strengthen the freedom and integrity of the nation."

"I further affirm that I shall never resort to violence and that I will continue to endeavor towards settlement of all difference and disputes relating to religion, language, region or other political or economic grievances by peaceful and constitutional means. "

दिनांक १९ नोव्हेंबर, २०२१ ते दिनांक २५ नोव्हेंबर, २०२१ हा सप्ताह 'कौमी एकता सप्ताह' म्हणून साजरा करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः कौएदि-२०२१/प्र.क्र.६८/का.८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १६ नोव्हेंबर, २०२१.

वाचा : १. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : जपूती २०२०/प्र.क्र.९५/२९, दिनांक १४ जानेवारी, २०२१.
२. शासन परिपत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग क्रमांक : कौएदि-२०२१/ प्र.क्र.६८/का.८, दिनांक १० नोव्हेंबर, २०२१.

**शुध्दीपत्रक :**

संदर्भाधीन क्रमांक २ येथील परिपत्रकातील परिच्छेद २ मध्ये

-यावर्षी **दिनांक २५ नोव्हेंबर, २०२१** रोजी राष्ट्रीय एकात्मकतेची शपथ घ्यावयाची आहे॰

या ऐवजी

-यावर्षी **दिनांक १९ नोव्हेंबर, २०२१** रोजी राष्ट्रीय एकात्मकतेची शपथ घ्यावयाची आहे॰

असे वाचण्यात यावे.

२. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेताक २०२११११६१३०४४५३३१४ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DINESH MADHAVRAO SONAVANE
Digitally signed by DINESH MADHAVRAO SONAVANE
DN: CN = DINESH MADHAVRAO SONAVANE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = MINORITY DEVELOPMENT DEPARTMENT
Date: 2021.11.16 13:25:04 +05'30'

(दि. मा. सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई,
६) सर्व विभागीय आयुक्त,
७) सर्व जिल्हाधिकारी,

८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
९) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,
१०) पोलिस महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य,
११) सर्व पोलिस आयुक्त,
१२) सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक,
१३) अध्यक्ष/ सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई
१४) अध्यक्ष/ कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई
१५) मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व महामंडळे, मंडळे आणि सार्वजनिक यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापकीय संचालक/प्रशासकीय अधिकारी
१६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
१७) कक्ष अधिकारी, सा.प्र.वि./२८ व २९, सामान्य प्रशासन अधिकारी, मंत्रालय, मुंबई
१८) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान कक्ष, मंत्रालय, मुंबई (२ प्रती संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)
१९) निवड नस्ती (का-८).